**Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02**
**ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU**
**International open-access peer-reviewed refereed monthly journal**
**https://knowledgeableresearch.com/index.php/1**

# कविता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता- एआय' निर्मित कविता :एक दृष्टिक्षेप

डा.रंगनाथ नवघडे*

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि.नांदेड

**शोध सार**

*साहित्य म्हणजे भाषेचा सृजनशील आणि कलात्मक वापर जो कल्पना, भावना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी केला जातो. ते लिखित किंवा मौखिक असू शकते .लेखकाच्या संवेदनशील मनाला आलेला अनुभूतींना कलात्मक आविष्कार म्हणजे साहित्य होय. अशी एक साहित्याची व्याख्या केली जाते. मराठी साहित्य ही व्यापक संकल्पना आहे. यामध्ये कविता, कथा ,कादंबरी, नाटक, बालसाहित्य, विनोदी साहित्य, ललित, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य आदी. असा खूप मोठा खजिना आहे. भाषा व साहित्य हे कला, साहित्य, संस्कृती समृद्ध करीत असतात.एका अर्थाने समाजालाच समृद्ध करण्याचे कार्य करतात. मराठी साहित्याचे स्वरूप पाहिले असता काळानुरूप बदललेले आहे.*

**बीज शब्द:** *साहित्य, कविता, कृत्रिम बुद्धिमत्ता, एआय-निर्मित, सृजनशील, कलात्मक, आविष्कार, मराठी, समाज*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
डा.रंगनाथ नवघडे
**Email:** navghaderw@gmail.com

**उद्दिष्टे :**

1)' कृत्रिम बुद्धिमत्ता- ए आय 'संकल्पना समजून घेणे.

2) साहित्य संकल्पना आकलन करून घेणे.

3) 'काव्य' म्हणजे काय जाणून घेणे.

4)' एआय निर्मित कविता माहिती करून घेणे.

5)मराठी साहित्यातील एआयच्या संधी आणि आव्हाने जाणून घेणे.

मराठी साहित्यात काव्य अथवा कविता हा प्रकार प्राचीन कालखंडापासून अखंडपणे वाहत आला आहे. मानवाचा पहिला आविष्कार काव्यातूनच झाला असे म्हटले जाते. कविता हा साहित्याचा महत्त्वाचा प्रकार आहे." मानवी जीवनात साहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.साहित्य माणसाला माणूसपण घडविण्याला साहाय्य भूत ठरते.साहित्य समृद्ध होण्यासाठी साहित्यात उत्कट व जिवंत अनुभवाचा आविष्कार असावा लागतो.या बाबतीत कवितेचे स्थान कायमच वरचे राहिले आहे.कवितेत कमीत कमी शब्दांत जीवनाचा अखंड अनुभव साकारण्याची किमया आहे.('एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता कुळवाडी अंभग '-पृष्ठ-5)थोडक्यात भावनेला अनेक छटा असतात. अशी जाणीव सदरील संदर्भावरून होते.

'कृत्रिम 'म्हणजे नैसर्गिक नसलेले ,मानवनिर्मित किंवा बनावट जे नैसर्गिक गोष्टीची नक्कल करते किंवा त्याचे अनुकरण करते. ही कृत्रिम वस्तू साधारणत: संगणकच असते. 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही संगणक शास्त्रातील एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण, त्याचे बुद्धिमान वर्तन, परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रात मोठे बदल घडत आहेत.आज शिक्षण,नोकरी, व्यवसाय, शेती, आरोग्य, साहित्य अशा अनेक क्षेत्रात 'एआय' चा वापर झपाट्याने वाढत आहे.संगणक, इंटरनेट ,मोबाईल आणि डिजिटल प्रणालीमुळे मानवी जीवन अधिक सुलभ झाले आहे.या तंत्रज्ञानाच्या प्रवासात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI)एआय ही आधुनिक जगासाठी एक क्रांतिकारी संकल्पना ठरली आहे.'एआय' म्हणजेच 'कृत्रिम बुद्धिमत्ता' होय किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संघणक प्रणालीला मानवी बुद्धिमत्ते सारखे विचार करण्यास, शिकण्यास आणि निर्णय घेण्यास सक्षम बनवणारे प्रणाली होय. 'कृत्रिम बुद्धिमत्ता- एआय' ही केवळ वैज्ञानिक किंवा तांत्रिक क्षेत्राकृती

मर्यादित न राहता भाषा आणि साहित्य क्षेत्रातही प्रभावीपणे प्रवेश करत आहे.

**साहित्य क्षेत्रात काव्य लेखन हा तसा कठीण साहित्यप्रकार आहे.**

कवितेला समृद्ध अशी परंपरा आहे. कार्यक्षेत्रात कवींची संख्या अधिक दिसून येते. या अनुषंगाने समीक्षक दिलीप पुरुषोत्तम चित्रे 'मराठी साहित्य व स्वरूप' या लेखातील मजकूर काव्याच्या अनुषंगाने नोंदविणे आवश्यक वाटते ते म्हणतात-" कविता हा अंतर्मुख आणि मितभाषी वांड्मय प्रकार आहे. हे जितके खरे, तितकेच तो कल्पनेची झेप घेऊन दूरवरच्या पदार्थांना एकाच अवकाशात एकवटणारा वांड्मय प्रकारही आहे. नैसर्गिक वातावरणातील इंद्रियगभ्य तपशील, मानवी मनोव्यापारांनी अनेक पदरी जाणीव, मानवी भावनांचे सूक्ष्म भान, सर्व सामाजिक व संस्कृतिक व्यवहारांकडे बघण्याची व्यक्ती विशिष्ट दृष्टी ,स्वभावाच्या आविष्कार शक्तींची जाण, स्वतःच्या वांड्मयीन परंपरेची खोल समज इत्यादी गुणांना काव्य लेखनात महत्त्व येते." (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पृष्ठ- 83 )मराठी कविता म्हणजे भावना, विचार आणि अनुभवांना लयबद्ध छंदोबद्ध किंवा मुक्तशैलीत ,प्रतिमा, अलंकार व प्रतिकांचा वापर करून भाषेच्या माध्यमातून व्यक्त करणे ज्यामुळे वाचकाच्या मनात आनंद, दुःख किंवा अन्य भावना जागृत होतात. ही एक भावनिक आणि कलात्मक अभिव्यक्ती आहे. अशी जाणीव यासंदर्भावरून होते. नवोदित कवीला हा संदर्भ बळ देणारा आहे.किंवा अतिशय महत्त्वाचा आहे.

अशी तीव्रतेने जाणीव होते. एआयनिर्मित कवितेत या सर्व बाबींचा नक्कीच अभाव दिसून येईल. त्याचप्रमाणे एआय निर्मित कविता सादरीकरण करण्यात आल्यानंतर किंवा आपण श्रवण केल्यावर त्यामध्ये भावनेचा ओलावा जाणवणार नाही.

त्याचप्रमाणे' या हृदयीचे त्या हृदयी' म्हणजे एका व्यक्तीच्या भावना, विचार किंवा संदेश दुसऱ्या व्यक्तीच्या हृदयापर्यंत थेट पोहोचविता येणार नाही. भावनिक नाते निर्माण करता येणार नाही. अशीही जाणीव एआयनिर्मित कवितेसंदर्भात होते.

साहित्य लेखनात स्व अनुभव असेल तर कुठलीही साहित्यकृती अधिक दर्जेदार व वाचनीय होते. म्हणून म्हणून नवोदित लेखकांनी किंवा कवींनी लेखन करताना स्वतःला आलेले अनुभव शब्दबद्ध करणे आवश्यक असतो. भूमिकानिष्ट कवी किंवा लेखक आपल्या साहित्यकृतीतून मानवी मूल्यांची पेरणी करतो. जेणेकरून समाज समृद्ध झाला पाहिजे.चांगले लिहिण्यासाठी विचारही समृद्ध असावे लागतात. कोणत्याही व्यवस्थेची खरी उपयुक्तता त्या व्यवस्थेच्या खऱ्या गरजूलाच सर्वाधिक समजत असते.

काव्यलेखन व निर्मितीचे तंत्रज्ञान उदा. छंद, मात्रासूत्र,शब्दबद्ध रचना, आलंकारिक भाषा यांना काव्यरचनांची निर्मिती करणे अवघड आहे .परंतु 'एआय' अर्थात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' कविता लेखन व निर्मिती प्रयोग करू शकते. उदा. एखाद्या पारंपारिक छंदात नवीन कविता तयार करणे किंवा एखाद्या प्रसिद्ध कवीच्या शैलीचे अनुकरण करून कविता तयार करू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता- एआयच्या मदतीने एखाद्या प्रसिद्ध लेखकाच्या किंवा कवीच्या शैलीत लेखन केले तर लेखकाच्या किंवा कवीच्या बौद्धिक मालमत्तेचे (Copyright)चा प्रश्न निर्माण होतो अशी जाणीव होते.हे तत्रंज्ञान वापर करण्यासाठी कायदेशीर चौकट आवश्यक आहे. या अनुषंगाने ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर 'नवी तंत्र क्रांती आकाराला येतेय ' या लेखातील संदर्भ नोंदविणे आवश्यक वाटते. ते म्हणतात-" एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेने आपलं दैनंदिन जीवन व्यापल आहे.भविष्यात एयायच्या संदर्भातही काही कठोर कायदे बनवण्याची वेळ जगावर येऊ शकते."( दीपोत्सव, पृष्ठ -175) तंत्रज्ञानाचा मानवी वर्तनावर आणि पर्यायाने समाजावर परिणाम होतो हे मानवी इतिहासात वारंवार सिद्ध झालेले आहे. या तंत्रज्ञानाला एका मर्यादेपर्यंत नियंत्रण ठेवणे तसेच जबाबदारीने, विवेकशीलतेने वापरणे ही काळाची गरज आहे. अशीही जाणीव यासंदर्भावरून होते. एआयनिर्मित तंत्रज्ञान नवीन कवी किंवा लेखकाला सहाय्यक म्हणून सहकार्य मिळते. भाषांतर, गुगल ट्रान्सलेट यामुळे इंग्रजी- मराठी भाषांतर सहज सोपे झाले आहे.त्याचप्रमाणे स्थानिक साहित्य जागतिक पातळीवर नेता येत आहे. डिजिटल साहित्यमुळे कागदाचा वापरही कमी झाला आहे. हे पर्यावरण दृष्टिने महत्त्वाचे आहे.नवोदित लेखकांना मार्गदर्शन मिळते ही साहित्यिकांसाठी संधी आहे. अशी जाणीव होते; परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता एआय वापराचे काही तोटेही आहेत जसे हे साहित्य सहज कॉफी करता येते.त्यामुळे लेखकाचे हक्क धोक्यात येतात. सर्वच डिजिटल साहित्य दर्जेदार नसते.कॉपी-पेस्टमुळे सर्जनशीलतेचा ,अनुभवाचा व संवेदनशील जाणिवेचा अभाव जाणवतो. विज्ञान -तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात अमुलाग्र बदल होत आहेत; परंतु समाजात यामुळे विकसित आणि अविकसित दरी निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तंत्रज्ञानात प्रामाणिकपणा, नैतिकता, निष्ठा, नैसर्गिकपणा उपकरणात नाही याचाही प्रत्यय एआय निर्मित साहित्य अभ्यासातून होतो.हे मानवी जीवनासमोर फार मोठे आव्हान असणार आहे. त्याचप्रमाणे अशीही जाणीव निर्माण होते की, एआयनिर्मित कविता आणि कवीच्या सृजनशीलतेतून अनुभवातून निर्माण झालेली कविता यात नक्कीच फरक

जाणवेल कविता हे अधिक सखोल व्यापक उत्कटतेचा आविष्कार आहे. ही जाणीव ठेवणे आवश्यक आहे .

एकंदरीत 'कृत्रिम बुद्धिमत्ता- ए आय' मुळात तंत्रज्ञान आहे. तंत्रज्ञानातून मूल्यांची पेरणी करण्याची अपेक्षा बाळगता येणार नाही. मानवाला भावनिक आधार देणे आवश्यक आहे. हे या तंत्रज्ञानाद्वारे शक्य नाही. अशीही तीव्रतेने जाणीव होते ;परंतु हेही तेवढे सत्य आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता -एयाय'ला आता रोखणे इथून पुढे अशक्य आहे. आवाका अफाट आहे. परिस्थितीनुरूप कृत्रिम बुद्धिमत्तेला नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या तंत्रज्ञानाचा वापर शक्य तितक्या सकारात्मक प्रकारे करण्यासाठी खूप सखोल विचार आणि त्यानुसार अंमलबजावणी या गोष्टींची आवश्यकता आहे .

**निष्कर्ष :**

1) 'कृत्रिम बुद्धिमत्ता- एआय' तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केला आहे.

2)या तंत्रज्ञानामुळे स्थानिक साहित्य जागतिक पातळीवर नेण्यासाठी सोपे झाले आहे.

3)साहित्य ही व्यापक संकल्पना आहे.

4)'कविता' हा साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

5)' कृत्रिम बुद्धिमत्ता-एआय' निर्मित कवितेतून नैतिकता आणि सांस्कृतिक मूल्य जोपासणे कठीण जाते.

6) 'कृत्रिम बुद्धिमत्ता-एआय' एक शक्तिशाली साधन आहे पण त्याचा वापर विवेकाने जबाबदारीने आणि मर्यादित स्वरूपात केला तरच तो खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरतो.

7) 'कृत्रिम बुद्धिमत्ता-एआय ए' आय आपली विचारशक्ती बदलण्यासाठी नाही तर ती अधिक सक्षम करण्यासाठी आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) जैतमहाल,' समाज माध्यमांवरील लेखन कौशल्ये', साकेत प्रकाशन ,छत्रपती संभाजीनगर ,पहिली आवृत्ती, 2024.

2) कहाते अतुल,' एयायचं तुफान 'मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे , प्रथम आवृती, ऑक्टोबर 2025.

3) संपादक,पवार गो. मा., हातकणंगलेकर म.द.,'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', पॉपुलर प्रकाशन, मुंबई ,पहिली आवृत्ती 19 86,( पृष्ठ- 83).

4) कार्यकारी संपादक, पांडागळे संतोष, दैनिक सत्यप्रभा,' दीपोत्सव', दिवाळी 2021 ,(पृष्ठ -175)

5) संपादक, डॉ. नवघडे रंगनाथ, 'एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता, कुळवाडी अभंग,इसाप प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 26 जून 2022, ( पृष्ठ-5

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)